# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Kalpataru Point, 2nd, 3rd, 4th floor, Opp. Cine Planet Cinema,
Sion Circle, Sion (E), MUMBAI – 400 022; **Ph:** 022-2401 4701 / 2402 4068
**Email:** jdair@mpcb.gov.in; **Website:** www.mpcb.gov.in

## PUBLIC NOTICE

**Sub: -** Registration of Producers, Importers & Brand-Owners (PIBOs) and Plastic Waste Processors (PWPs) on Centralized Extended Producer Responsibility (EPR) Portal for Plastic Packaging.

Ministry of Environment, Forest & Climate Change (MoEFCC), Govt. of India, notified guidelines on Extended Producer Responsibility (EPR) for Plastic Packaging vide fourth amendment to Plastic Waste Management (PWM) Rules on February 16, 2022. Producers, Importers & Brand-Owners (PIBOs) and Plastic Waste Processors (PWPs) are required to register on centralized EPR Portal developed by Central Pollution Control Board (CPCB) to fulfil their EPR liability as per the notified EPR Guidelines.

The PIBOs are required to obtain registration from CPCB if operating in more than two States/UTs and from concerned State Pollution Control Board (SPCB) / Pollution Control Committee (PCC) if operating in one or two States/UTs only. Also, PWPs are required to obtain registration from the concerned SPCBs/PCCs.

The EPR Portal (https://eprplastic.cpcb.gov.in/#/plastic/home) was launched on April 05, 2022. However, it is observed that several PIBOs & PWPs are still operating their business without obtaining registration from CPCB/MPCB (as applicable) which is in violation of provisions of PWM Rules 2016 (as amended).

This notice is being issued to inform all the PIBOs & PWPs to obtain registration from CPCB/MPCB (as applicable) in accordance with provisions of PWM Rules, 2016. PIBOs & PWPs, who have not yet applied for registration are required to submit registration application complete in all respects on the EPR Portal. Guidance Manual and the Standard Operating Procedure (SOP) for registration of PIBOs/PWPs, uploaded on EPR Portal, may be referred to for the purpose.

Necessary action, as deemed appropriate under the Environment (Protection Act), 1986, including levying of Environmental Compensation and closure of operations, shall be taken against defaulters.

Sd/-
(Dr.Avinash Dhakne, IAS)

**Place:** Mumbai
Member Secretary,

**Date:** 08/04/2024
Maharashtra Pollution Control Board

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

MAHARASHTRA

कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८, शीव सर्कलसमोर,
शीव (पूर्व) मुंबई – ४०० ०२२. **दूरध्वनी क्र.** २४०१०४३७/२४०२०७८१
**Email:** jdair@mpcb.gov.in ; **Website:** https://www.mpcb.gov.in

## जाहीर सूचना

**विषय :** प्लॅस्टिक पॅकेजिंगसाठी केंद्रीकृत विस्तारित उत्पादक जबाबदारी (ईपीआर) पोर्टलवर उत्पादक, आयातदार आणि ब्रँड–मालक (PIBOs) आणि प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योग (PWPs) यांची नोंदणी.

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयान (MoEFCC) दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (PWM) नियमांमध्ये चौथ्या दुरुस्तीनुसार प्लास्टिक पॅकेजिंगसाठी विस्तारित उत्पादक जबाबदारी नुसार (EPR) अधिसूचित मार्गदर्शक तत्त्वे उत्पादक, आयातदार आणि ब्रँड–मालक (PIBOs) आणि प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योग (PWPs) यांचेसाठी निश्चित केलीली आहेत. सदर अधिसूचित (ईपीआर) मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे ईपीआर दायित्व पूर्ण करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) विकसित केलेल्या केंद्रीकृत ईपीआर पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

उत्पादक, आयातदार आणि ब्रँड–मालक (PIBOs) दोनपेक्षा जास्त राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये कार्यरत असल्यास केन्द्रीय प्रदूषण मंडळाकडून (CPCB) तथा फक्त एक किंवा दोन राज्ये/ केंद्रशासित प्रदेशांमध्ये कार्यरत असल्यास संबंधित राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (SPCB) नोंदणी घेणे आवश्यक आहे. तसेच, प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योगाला (PWPs) ला संबंधित राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नोंदणी प्राप्त करणे आवश्यक आहे.

ईपीआर पोर्टल (https://eprplastic.cpcb.gov.in/#/plastic/home) ०५ एप्रिल २०२२ रोजी सुरू करण्यात आले. तथापि, असे आढळून आले आहे की अनेक उत्पादक, आयातदार आणि ब्रँड–मालक (PIBOs) आणि प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योग (PWPs) अजूनही नोंदणी न करता त्यांचा व्यवसाय चालवत आहेत व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (PWM) नियम २०१६ अन्वये सुधारित केल्यानुसार च्या तरतुदींचे उल्लंघन करत आहे.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (PWM) नियम, २०१६ च्या तरतुदींनुसार सर्व उत्पादक, आयातदार आणि ब्रँड–मालक (PIBOs) आणि प्लास्टिक कचरा पुनर्प्रक्रिया उद्योगाला (PWPs) केन्द्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून/ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नोंदणी मिळविण्यासाठी सूचित करण्यासाठी ही नोटीस जारी केली जात आहे.

ज्या उत्पादक, आयातदार आणि ब्रँड–मालक (PIBOs) व पुनर्प्रक्रिया उद्योगांनी (PWPs) विस्तारित उत्पादक जबाबदारी (EPR) नोंदणी केलीली नाही त्यांनी ईपीआर पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच नोंदणीसाठी ईपीआर पोर्टलवर अपलोड केलेल्या पीआयबीओ/पीडब्ल्यूपीच्या मार्गदर्शक नियमावलीचा वापर आणि मानक कार्यप्रणालीचा (SOP) वापर करू शकतात.

वरील नियमांचे अनुपालन न करणाऱ्या उद्योगावर पर्यावरण (संरक्षण कायदा), १९८६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, ज्यामध्ये पर्यावरणीय नुकसान भरपाई आकारणे आणि उद्योगाचे कामकाज बंद करणे यासारख्या तरतुदीचा समावेश आहे याची कृपया नोंद घ्यावी.

सही/–
(डॉ.अविनाश ढाकणे, भा. प्र . से)
सदस्य सचिव
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**स्थळ :** मुंबई
**दिनांक :** ०८/०४/२०२४